Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 4.567 Renew (IIFS)} Vol. 37, No.2, Jul-Dec 2020. pp 58-67

# Geographical Study of Changing Population Characteristics in Nashik Administrative Region (2001-2011)

# नाशिक प्रशासकीय विभागातील लोकसंख्या वैशिष्ट्ये बदलांचा भौगोलिक अभ्यास (२००१-२०११)

Manisha Muthal
Dr. Virendra Nagarale

***Abstract***

*Population is the most important transitional and fast changing factor on the earth. The quantitative aspects of population are- population growth, distribution, density, age structure, sex-ratio, rural-urban, population, urbanization, and migration. Whereas literacy, working population, occupation structure are the qualitative aspects. The change in the various population aspects of a particular region affects the social, economic, and other factors of the overall region and its development. Gradually the population and its nature act as the base of economic and development of the region and the state and country as a whole.The following essay is focusing on the finding of the changesin the aspects of the population of Nashik administrative regionfor 2001 to 2011. It focuses on the study of population and its aspects from the five districts- Nashik, Ahmednagar, Jalgaon, Dhule and Nandurbar districts from Nashik division.*

**गोषवारा**

लोकसंख्या हा पृथ्वीवरील परिवर्तनशील व गतिमान घटक आहे. या लोकसंख्येचे वाढ, वितरण, घनता, वयोरचना, लिंगगुणोत्तर, ग्रामीण–शहरी लोकसंख्या, नागरीकरण, स्थलांतर हे संख्यात्मक घटक व साक्षरता, कार्यकारी लोकसंख्या, व्यावसायिक रचना हे गुणात्मक घटक आहे. एखाद्या प्रदेशातील लोकसंख्येतील विविध घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा परिणाम हा त्या संपूर्ण प्रदेशातील सामाजिक, आर्थिक व इतर अनेक घटकांवर होत असतो. म्हणजेच त्या प्रदेशाच्या व ओघाने त्या राज्य व देशाच्या अर्थव्यवस्था आणि विकासाचा पाया ही लोकसंख्या व तिची वैशिष्ट्ये आहेत. प्रस्तुत शोधनिबंध हा नाशिक प्रशासकीय विभागातील २००१ ते २०११ या कालावधीतील लोकसंख्या वैशिष्ट्ये बदलाच्या संदर्भात आहे. नाशिक विभागातील नाशिक, अहमदनगर. जळगाव, धुळे, नंदुरबार या पाच जिल्ह्यांच्या लोकसंख्येचा अभ्यास यात केला आहे.

**बीजसंज्ञा - लोकसंख्या, लोकसंख्यावाढ, जनगणना, स्त्री–पुरुष प्रमाण**

**प्रस्तावना**

कोणत्याही प्रदेशाच्या विकासाबाबत महत्त्वाचा पैलू म्हणजे तेथील लोकसंख्या असते. या लोकसंख्येच्या आकडेवारीवरून त्या–त्या–काळातील, त्या प्रदेशाची, आर्थिक स्थिती कळते. तसेच काळानुसार लोकसंख्येत होणाऱ्या बदलांची नैसर्गिक साधनसंपत्ती व इतर घटकांशी सांगड घालत वर्तमानस्थिती व भविष्यकालीन अंदाजाचाही अभ्यास करणे सोपे होते. यामुळेच जगात सर्वत्र अनेक स्तरावर लोकसंख्या व तिच्या संबंधित घटकांचा अभ्यास केला जात आहे. महाराष्ट्र राज्यातील कोकण, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती या सहा विभागांपैकी एक असणाऱ्या नाशिक विभागातील लोकसंख्येची आकडेवारी व तिचे विश्लेषण हे देखील विभागाचे प्रादेशिक व आर्थिक विकासाचे मर्म कळण्यास व विविध समस्यांच्या आकलनाद्वारे नियोजनाची दिशा निश्चित करण्यास अभ्यासणे गरजेचे आहे.

लोकसंख्या वाढीतील बदल व शाश्वत विकासासाठी लोकसंख्येची गुणवत्ता अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

कायमचे वास्तव्य करणाऱ्या लोकसंख्येत स्थलांतरितांची भर पडल्याने लोकसंख्या वाढते व त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात (वायकर, २०१७). सामाजिक व आर्थिक परिस्थिती आणि राहणीमानाचा दर्जा यांचा संबंध लोकसंख्या वाढीशी असतो. तसेच वाढणाऱ्या मुबलक सुविधा, वैद्यकीय सुविधांची उपलब्धता, आरोग्यविषयी जागरूकता, अन्नधान्याचे मुबलक उत्पादन यामुळे लोकसंख्या वाढ जास्त होते (भावसार, २०१३). प्रामुख्याने सुपीक शेतीयोग्य प्रदेशात लोकसंख्या व लोकसंख्यावाढ ही पडीक व डोंगराळ भागापेक्षा जास्त आढळते (पाटील, २०१४). शेती व जलसिंचन सुविधा, मानवी संसाधने व आर्थिक व्यवसाय, वैद्यकीय सुविधा तसेच दुष्काळासारख्या आपत्तीची लोकसंख्येच्या दरात महत्त्वाची भूमिका असते (कर्णिक, २०१५). लोकसंख्यावाढआर्थिक विकासानुसार कमी–जास्त आढळते (पाटील, २०१४).

**उदीष्ट्ये**


१) नाशिक विभागातील जिल्ह्यातील २००१ ते २०११ या दशकातील लोकसंख्यावाढ अभ्यासणे.


२) नाशिक विभागातील जिल्हानिहाय २००१ ते २०११ या दशकातील स्त्री–पुरुष लोकसंख्यावाढ, वृद्धी अभ्यासणे.

**अभ्यास पद्धती**

नाशिक विभागातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यासाठी द्वितीय स्त्रोताचा प्रामुख्याने वापर केलेला असून यामध्ये भारतीय जनगणना अहवाल पुस्तिका २००१ व २०११, संबंधित प्राकृतिक व राजकीय नकाशे, संदर्भ ग्रंथ यांचा संदर्भ घेतला आहे. प्रथम २००१ व २०११ या कालावधीतील नाशिक विभागातील नाशिक, अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार या पाचही जिल्ह्यांचे नकाशे व माहिती मिळविली. या जिल्हानिहाय माहितीच्या अभ्यासाद्वारे नाशिक प्रशासकीय विभागाच्या प्राकृतिक आणि प्रशासकीय घटकांचा एकत्रित अभ्यास व आकडेवारीद्वारे लोकसंख्या अभ्यासली आहे. यामध्ये प्रामुख्याने लोकसंख्येच्या लोकसंख्यावाढ, वितरण, घनता, वयोरचना, ग्रामीण–शहरी लोकसंख्या, लिंगगुणोत्तर, नागरीकरण, स्थलांतर, साक्षरता या वैशिष्ट्यांपैकी फक्त लोकसंख्या, लोकसंख्यावाढ या संख्यात्मक वैशिष्ट्यांचा अभ्यास केला आहे. त्यासाठी संकलित माहितीचे वर्गीकरण व त्याद्वारे पृथःकरण करत नकाशाशास्त्रीय तंत्राद्वारे आलेख काढून लोकसंख्येतील बदल अभ्यासात लोकसंख्यावाढीतील संभाव्य कारणे अभ्यासली आहेत.

नाशिक विभागाचा विस्तार १८°२' ते २२°०' उत्तर अक्षांश व ७३°१६' ते ७६°२८' पूर्व रेखांश दरम्यान आहे. नाशिक विभाग हा महाराष्ट्र राज्यात उत्तर पश्चिमेस असून, या विभागाच्या पश्चिमेला कोकणविभाग व गुजरात राज्य, पूर्वेला औरंगाबाद विभाग (मराठवाडा) व अमरावती विभाग (पश्चिम विदर्भ), उत्तरेस मध्यप्रदेश राज्य, दक्षिणेस पुणे विभाग (पश्चिम महाराष्ट्र) आहे. या विभागातील उत्तर पूर्वेला दक्षिण पठारावर स्थित भागास खानदेश म्हणतात. त्याचे पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश असे दोन भाग आहे. १) पश्चिम खानदेश म्हणजे धुळे हे उत्तर पूर्वेला सातपुडा पर्वत व पश्चिमेला पश्चिम घाट, उत्तर पश्चिमेला नर्मदा नदी या दरम्यान आढळते. या प्रदेशात तापी, पांझरा नद्या वाहतात. २) पूर्व खानदेश म्हणजे जळगाव हे उत्तरेस सातपुडा पर्वत, दक्षिणेस अजिंठा डोंगर या दरम्यान असून येथे तापी व गिरणा नद्या वाहतात. त्याचप्रमाणे नाशिक विभागात गोदावरी, प्रवरा नद्याही महत्त्वाच्या आहेत. नाशिक विभागाचे


अभ्यासक्षेत्र -स्थान
भारत
सुची
महाराष्ट्र राज्य
८०० ४०० 0 ८००
की.मी.
महाराष्ट्र राज्य
सुची
नाशिक विभाग
२०० १०० 0 २००
की.मी.


नाशिक विभाग
नंदुरबार
धुळे
जळगांव
नाशिक
अहमदनगर
सुची
विभाग शिमा
जिल्हा शिमा
उत्तर
४० २० 0 ४० ८०
की.मी.
22°0'0"N
21°0'0"N
20°0'0"N
19°0'0"N
73°0'0"E
74°0'0"E
75°0'0"E
76°0'0"E
77°0'0"E

क्षेत्रफळ ५७,४९३ चौ.किमी. असून या विभागात क्षेत्रफळाच्या दृष्टीने अहमदनगर मोठे आहे. एकूण सुमारे १,८५,७९,४२० (२०११ नुसार) लोकसंख्येपैकी सर्वाधिक लोकसंख्या नाशिक शहरात आहे. नाशिक साक्षरतेचे प्रमाण ७८.०२ टक्के आहे. नाशिक विभागातील ८,०६० चौ.किमी. क्षेत्र ओलिताखाली असून, प्रामुख्याने ज्वारी, कापूस, कांदे, गहू, तांदूळ, नागली, द्राक्ष, ऊस, केळी, डाळींब ही पिके घेतली जातात.

**विश्लेषण**

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या ४९,९३,७९६ (२००१ नुसार), ती पुढील १० वर्षात ११.१३ लाखाने वाढून ६१,०७,१८७ इतकी झाली. नाशिक जिल्ह्यात विभागातील सर्वाधिक नागरी लोकसंख्या १९,३७,५५६ (२००१ नुसार) आढळते. या लोकसंख्येत २०११ पर्यंत २५,७९,३७३ इतकी वाढ झाली आहे. नागरी लोकसंख्यावाढीचे हे प्रमाण पुढील दहा वर्षांत ३.७३ टक्क्यांनी वाढलेले आढळते. तर अहमदनगरपाठोपाठ नाशिकमध्ये विभागातील इतर जिल्ह्यांपेक्षा अधिक ग्रामीण लोकसंख्या (३०,५०,२४०) आढळते. नाशिकमधील लोकसंख्यावाढीचा दर नंदूरबार जिल्ह्याखालोखाल म्हणजेच २२.३० इतका असून त्यानंतर अहमदनगर, जळगाव, धुळे मधील लोकसंख्यावाढ आहे. येथे लोकसंख्येची सर्वाधिक घनता ३९३ (२०११ नुसार) आहे. येथील एकूण लोकसंख्येत ५१.७० टक्के पुरुष व ४८.३० टक्के स्त्रियांचे प्रमाण आढळते.

अहमदनगर या नाशिक विभागातील क्षेत्रफळाने सर्वाधिक मोठ्या जिल्ह्यात नाशिक जिल्ह्यानंतर सर्वात जास्त लोकसंख्या आढळते. ही ४०,४०,६४२ (२००१ नुसार) लोकसंख्या पुढील दहा वर्षांत ५,०२,५१७ ने वाढून ४५,४३,१५९ इतकी झालेली आढळते. तसेच येथे विभागातील सर्वाधिक ग्रामीण लोकसंख्या २००१ नुसार ३२,३६,९४५ इतकी होती. तर २०११ मध्ये या लोकसंख्येत वाढ होऊन ती ३६,३०,५४२ इतकी वाढलेली आढळते. अहमदनगरमध्ये नाशिक, जळगाव खालोखाल सर्वाधिक नागरी लोकसंख्या २००१ व २०११ नुसार अनुक्रमे ८,०३,६९७ व ९,१२,६१७ इतकी आढळते. नागरी लोकसंख्यावाढीत अहमदनगरचा नाशिक विभागात चौथा क्रमांक असून, नागरी लोकसंख्यावाढ २०.०९ टक्के आहे. तसेच अहमदनगरमध्ये लोकसंख्येची घनता नाशिक व जळगाव खालोखाल २६६ (२०११ नुसार) इतकी आढळते. अहमदनगरमध्ये विभागातील सर्वात कमी लोकसंख्येचा वृद्धीदर १२.४३ आढळतो. तसेच पुरुषांचे प्रमाण ५१.५७ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण ४८.४३ टक्के आढळते.

जळगाव जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या बाबतीत नाशिक व अहमदनगरनंतर तिसरा क्रमांक असून ३६,८२,२९० (२००१ नुसार) लोकसंख्या असून ती २०११ पर्यंत ४२,२९,९१७ इतकी वाढलेली आढळते. याकाळात ग्रामीण लोकसंख्येत २,५७,३१० तर नागरी लोकसंख्येत २,८९,९१७ ने वाढझालेली आढळते. तर पुरुषांच्या संख्येत २,८९,९१७(५१.५७ टक्के) व स्त्रियांच्या संख्येत २,५५,३५५, (४८.४३ टक्के) इतकी वाढ झालेली दिसते. जळगाव जिल्ह्यात लोकसंख्येचा वृद्धीदर १४.८६ इतका कमी आढळतो. जळगावमध्ये नाशिक जिल्ह्यापाठोपाठ लोकसंख्येची घनता ३६० (२०११ नुसार) इतकी आढळते.

धुळे जिल्ह्यात २००१ व २०११ मध्ये अनुक्रमे १७,०७,९४७ व २०,५०,८६२ इतकी लोकसंख्या आढळते. ही नाशिक विभागातील नाशिक, अहमदनगर, जळगाव जिल्ह्यांनंतरची जास्त (८.३४ टक्के) लोकसंख्या आहे. धुळे जिल्ह्यात २००१ नुसार १२.६२ लाख ग्रामीण व ४.४६ लाख नागरी लोकसंख्या आढळते. पुढील दहा वर्षांत या लोकसंख्येत अनुक्रमे १४.७९ लाख व ५.७१ लाख इतकी वाढ झालेली आढळते. धुळे जिल्ह्यात २७.८४

टक्के (२०११ नुसार) इतकी नागरी लोकसंख्या वाढ आढळते. या काळात जिल्ह्यातील पुरुषांचे प्रमाण १.६७ लाखाने वाढून २०११ नुसार ते अनुक्रमे ५१.३९ टक्के व ४८.६१ टक्के वाढलेले आढळते.

नंदूरबार या आदिवासी व मागासलेल्या जिल्ह्यात लोकसंख्या १३,११,७०९ (२००१ नुसार) इतकी होती. २०११ मध्ये ती ३.६७ लाखाने वाढून १६,४८,२९५ इतकी वाढली. परंतु ही लोकसंख्या नाशिक विभागातील इतर सर्व जिल्ह्यांपेक्षा सर्वात कमी आहे. नंदुरबारमध्ये ग्रामीण लोकसंख्या अनुक्रमे ८४.५५ टक्के व ८२.२९ टक्के आणि नागरी लोकसंख्या अनुक्रमे १५.४५ व १६.७१ टक्के आढळते. तसेच एकूण लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण ५०.५५ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण ४९.४५ टक्के आहे. नंदुरबारमधील सर्वाधिक लोकसंख्येचा वृद्धीदर (२५.६६) आढळतो.

नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यातील २००१ व २०११ या लोकसंख्येची तुलना करता, विभागातील एकूण लोकसंख्या २८,४,६३६ इतकी वाढलेली आढळते. नाशिक विभागातील लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार १,५७,३६,७८४ इतकी होती. त्यापैकी पुरुषांची संख्या ८१,२१,३४१ तर स्त्रियांची संख्या ७६,१५,४४३ होती. विभागात प्रामुख्याने नागरी लोकसंख्या ४४.४३ लाख इतकी असली तरी त्यापेक्षा ग्रामीण भागातील लोकसंख्या ४४.४३ लाख इतकी असली तरी त्यापेक्षा ग्रामीण भागातील लोकसंख्या १.१३ कोटी इतकी जास्त आढळते. नाशिक विभागातील लोकसंख्येचे हे प्रमाण २०११ मध्ये वाढलेले असून २०११ जनगणना अहवालानुसार विभागाची एकूण लोकसंख्या १,८५,७९,४२० इतकी वाढली आहे. त्यात पुरुषांची संख्या ९५,८४,५७७ व स्त्रियांची संख्या ८९,९४,८४३ इतकी आढळते. तसेच ग्रामीण लोकसंख्या १,२८,८०,२०९ तर नागरी लोकसंख्या ५६,९९,२११ आढळते. ग्रामीण लोकसंख्येपेक्षा नागरी लोकसंख्यावाढ ३,२९,४२४ इतकी जास्त आढळते. नाशिक विभागातील नागरी लोकसंख्या २७.७८ टक्के (२०११ नुसार) इतकी असून विभागातील लोकसंख्येचा वृद्धीदर १८.०६ इतका आढळतो.

नाशिक विभागातील २००१ व २०११ या कालावधीतील लोकसंख्या बदलातील ठळक वैशिष्ट्ये म्हणजे नाशिक विभागातील एकूण लोकसंख्येपैकी सर्वाधिक लोकसंख्या नाशिक जिल्ह्यात (अनुक्रमे ४९.९३ लाख व ६१.०७ लाख) आढळते. तसेच लोकसंख्येची सर्वाधिक घनता (अनुक्रमे ३२२ व ३९३) आढळते. याउलट विभागातील सर्वात कमी लोकसंख्या नंदुरबार जिल्ह्यात (अनुक्रमे १३.११ लाख व १६.४८ लाख) आढळते. अहमदनगर जिल्ह्यात नाशिक जिल्ह्यानंतर सर्वाधिक लोकसंख्या आढळते. परंतु अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रम ळ जास्त असल्याने येथे लोकसंख्येची घनता २६६ (२०११ नुसार) सर्वात कमी आढळते. अहमदनगर जिल्ह्यात विभागातील सर्वाधिक ग्रामीण लोकसंख्या (अनुक्रमे ३२.३६ लाख व ३६.३० लाख) आढळते. अहमदनगर जिल्ह्यात विभागातील सर्वाधिक ग्रामीण लोकसंख्या (अनुक्रमे ३२.३६ लाख व ३६.३० लाख) आढळते. तर सर्वाधिक नागरी लोकसंख्या नाशिक जिल्ह्यात (अनुक्रमे १९.३३ लाख व २५.९७ लाख) आढळते. याउलट सर्वात कमी ग्रामीण व नागरी लोकसंख्या नंदुरबार जिल्ह्यात आहे. तसेच विभागातील सर्वाधिक पुरुषांची संख्या (अनुक्रमे २५.९० लाख व ३१.५७ लाख) व स्त्रियांची संख्या (अनुक्रमे २४.०२ व २९.५० लाख) ही नाशिक जिल्ह्यात आढळते. याउलट नंदुरबार जिल्ह्यात हे प्रमाण सर्वात कमी आहे. परंतु विभागातील नाशिक जिल्ह्यात सर्वात कमी लिंगगुणोत्तर (अनुक्रमे ९२७ व ९३४) आढळते. याउलट नंदुरबारमध्ये सर्वाधिक (अनुक्रमे ९७७ व ९७८) लिंगगुणोत्तर आढळते.

## सारणी क्र. १

| | नाशिक | | जळगाव | | अहमदनगर | | धुळे | | नंदुरबार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००१ | २०११ | २००१ | २०११ | २००१ | २०११ | २००१ | २०११ | २००१ | २०११ |
| क्षेत्रफळ | १५५३० | | ११७६५ | | १७०४८ | | ७१९५ | | ५९५५ | |
| तालुके | १५ | | १५ | | १४ | | ४ | | ६ | |
| गावे | १९२९ | १९२२ | १५१९ | १५१३ | १५८७ | १५८४ | ६८१ | ६७८ | ९४७ | ९४३ |
| शहरे | १८ | २५ | १५ | २० | १८ | १९ | ३ | ८ | ५ | ९ |
| एकूण लोकसंख्या | ४९९३७९६ | ६१०७१८७ | ३६८२६९० | ४२२९९१७ | ४०४०६४२ | ४५४३१५९ | १७०७९४७ | २०५०८६२ | १३११७०९ | १६४८२९५ |
| लोकसंख्या वाढ | २९.७० | २२.३० | १५.५० | १४.८६ | १९.८० | १२.४४ | १५.९० | २०.०८ | २३.४० | २५.६६ |
| घनता | ३२२ | ३९३ | ३१३ | ३६० | २३७ | २६६ | २३७ | २८५ | २२० | २७७ |
| ग्रामीण | ३०५६२४० | ३५०९८१४ | २६२९८९६ | २८८७२०६ | ३२३६९४५ | ३६३०५४२ | १२६२०६२ | १४७९८२६ | ११०९०३६ | १३७२८२१ |
| शहरी | १९३७५५६ | २५९७३७३ | १०५२७९४ | १३४२७११ | ८०३६९७ | ९१२६१७ | ४४५८८५ | ५७१०३६ | २०२६७३ | २७५४७४ |
| नागरी लोकसंख्या | ३८.८० | ४२.५३ | २८.६० | ३१.७४ | १९.९० | २०.०९ | २६.१० | २७.८४ | १५.५० | १६.७१ |
| लिंगगुणोत्तर | ९२७ | ९३४ | ९३३ | ९२५ | ९४० | ९३९ | ९४४ | ९४६ | ९७७ | ९७८ |
| पुरुष | २५९०११२ | ३१५७१८६ | १९०५४९३ | २१९७३६५ | २०८३०५३ | २३४२८२५ | ८७८३८७२ | १०५४०३१ | ६६३५११ | ९३३१७० |
| स्त्रिया | २४०२८८४ | २९५०००१ | १७७७१९७ | २०३२५५२ | १९५७५८९ | २२००३९४ | ८२९५७५ | ५९६७३१ | ६४८१९८ | ८१५१२५ |
| साक्षरता | ७४.४० | ८२.३१ | ७५.४० | ७८.२० | ७५.३० | ७९.६५ | ७१.७० | ७२.८० | ५५.८० | ६४.३८ |
| वयोरचना (० – ६) | ७८५३९८ | ८२७९३५ | ५२५६६८ | ५३२००५ | ५८५७०६ | ५५६०१४ | २५५२३१ | २७३५०७ | २३०२१३ | २४०२२२ |
| अनु. जाती | ८.८० | ९.०८ | ७.८० | ९.२० | १२.०० | १२.६३ | ६.४० | ६.२२ | ३.२० | २.९१ |
| अनु. जमाती | २३.९० | २५.६२ | ११.८० | १४.२९ | ७.५० | ८.८३ | २६.०० | ३१.५६ | ६५.५० | ६९.२८ |
| व्यवसाय रचना | | | | | | | | | | |
| एकूण कामगार | ४३.८० | ४५.२५ | ४२.५० | ४४.०६ | ४६.०० | ४८.५३ | ४३.२० | ४५.६६ | ४६.५० | ४८.०५ |
| मुख्य कामगार | ३८.३० | ४१.३१ | ३५.३० | ३८.८६ | ३९.९० | ४४.८९ | ३३.६० | ४०.२७ | ३४.९० | ४०.३० |
| किरकोळ कामगार | ५.५० | ३.९३ | ७.२० | ५.१९ | ६.१० | ३.६३ | ९.६० | ५.३९ | ११.६० | ७.७६ |
| इतर | ५६.२० | ५४.७५ | ५७.५० | ५५.९४ | ५४.०० | ५१.४७ | ५६.८० | ५४.३४ | ५३.५० | ५१.९५ |
| कामगार श्रेणी | | | | | | | | | | |
| शेतकरी | ३७.७० | ३५.०१ | २४.१० | २०.६२ | ४४.४० | ४५.९५ | २७.७ | २५.५४ | ३३.७० | २६.७२ |
| शेतमजूर | २४.७० | २६.४३ | ४६.७० | ५०.२९ | २५.३० | २५.३६ | ४२.८० | ४५.८७ | ४७.९ | ५५.३२ |
| वस्तुनिर्मिती | २.२० | २.०३ | २.४० | २.०९ | २.९० | २.५९ | २.९० | २.२० | १.७० | १.८४ |
| इतर | ३५.४ | ३६.५४ | २६.८० | २७.०० | २७.४० | २३.१० | २६.६० | २६.३८ | १६.८० | १६.११ |


## सारणी क्र. २ - नाशिक विभागातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या, स्त्री-पुरुष प्रमाण

| अ.क्र. | जिल्हा | विशेष | २००१ | | | २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी |
| १ | नाशिक | एकूण | ४९९३७९६ | ३०५६२४० | १९३७५५६ | ६१०७१८७ | ३५०९८१४ | २५९७३७३ |
| | | पुरुष | २५९०९१२ | १५७१२२१ | १०१९६९१ | ३१५७९८६ | १८०४७१२ | १३५२४७४ |
| | | स्त्रिया | २४०२८८४ | १४८५०१९ | ९१७८६५ | २९५०००१ | १७०५१०२ | १२४४८९९ |
| २ | अहमदनगर | एकूण | ४०४०६४२ | ३२३६९४५ | ८०३६९७ | ४५४३१५९ | ३६३०५४२ | ९१२६१७ |
| | | पुरुष | २०८३०५३ | १६६१८११ | ४२१२४२ | २३४२८२५ | १८७२९०७ | ४६९९१८ |
| | | स्त्रिया | १९५७५८९ | १५७५१३४ | ३८२४५५ | २२००३३४ | १७५७६३५ | ४४२६९९ |
| ३ | जळगाव | एकूण | ३६८२६९० | २६२९८९६ | १०५२७९४ | ४२२९९१७ | २८८७२०६ | १३४२७११ |
| | | पुरुष | १९०५४९३ | १३५७०३१ | ५४८४६२ | २१९७३६५ | १५००५१४ | ६९६८५१ |
| | | स्त्रिया | १७७७१९७ | १२७२८६५ | ५०४३३२ | २०३२५५२ | १३८६६९२ | ६४५८६० |
| ४ | धुळे | एकूण | १७०७९४७ | १२६२०६२ | ४४५८८५ | २०५०८६२ | १४७९८२६ | ५७१०३६ |
| | | पुरुष | ८७८३७२ | ६४६३६४ | २३२००८ | १०५४०६१ | ७५८९१६ | २९४११५ |
| | | स्त्रिया | ८२९५७५ | ६१५६९८ | २१३८७७ | ९९६८३१ | ७२०९१० | २७५९२१ |
| ५ | नंदूरबार | एकूण | १३११७०९ | ११०९०३६ | २०२६७३ | १६४८२९५ | १३७२८२१ | २७५४७४ |
| | | पुरुष | ६६३५११ | ५५८५१३ | १०४९९८ | ८३३१७० | ६८७६७१ | १४५४९९ |
| | | स्त्रिया | ६४८१९८ | ५५०५२३ | ९७६७५ | ८१५१२५ | ६८५१५० | १२९९७५ |
| एकूण (५ जिल्हे) | | एकूण | १५७३६७८४ | ११२९४१७९ | ४४४२६०५ | १८५७९४२० | १२८८०२०९ | ५६९९२११ |
| | | पुरुष | ८१२१३४१ | ५७९४९४० | २३२६४०१ | ९५८४५७७ | ६६२४७२० | २९५९८५७ |
| | | स्त्रिया | ७६१५४४३ | ५४९९२३९ | २११६२०४ | ८९९४८४३ | ६२५५४८९ | २७३९३५४ |

**(स्त्रोत – जनगणना अहवाल २००१ व २०११)**

**सारणी क्र. ३ - नाशिक विभागातील लोकसंख्या व वाढ**

| अ.क्र. | जिल्हा | लोकसंख्या २००१ | लोकसंख्या २०११ | दशकीय बदल | वृद्धीदर |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ४९९३७९६ | ६१०७१८७ | १११३३९१ | २२.३० |
| २ | अहमदनगर | ४०४०६४२ | ४५४३१५९ | ५०२५१७ | १२.४३ |
| ३ | जळगाव | ३६८२६९० | ४२२९९१७ | ५४७२२७ | १४.८६ |
| ४ | धुळे | १७०७९४७ | २०५०८६२ | ३४२९१५ | २०.०८ |
| ५ | नंदूरबार | १३११७०९ | १६४८२९५ | ३३६५८६ | २५.६६ |
| | **एकूण नाशिक विभाग** | १५७३६७८४ | १८५७९४२० | २८४२६३६ | १८.०६ |



**निष्कर्ष**

नाशिक विभागातील एकूण लोकसंख्येचा अभ्यास केला असता लोकसंख्या वाढीची पुढीलप्रमाणे वैशिष्ट्ये आढळली.

नाशिक विभागातील सर्वाधिक लोकसंख्या नाशिक जिल्ह्यात असून २००१ व २०११ नुसार ती अनुक्रमे ३१.७३ टक्के व ३२.८७ टक्के इतकी आढळते. या काळात एकूण लोकसंख्येत ११.१३ लाखाने वाढ झाली आहे. नाशिकमधील वाढते औद्योगिकीकरण, रोजगार संधी, नागरीकरण, वाहतूक व इतर सुविधांमुळे सर्वाधिक नागरी लोकसंख्यावाढ (४२.५३ टक्के) आढळते. तसेच गोदावरी व गिरणा नद्या व उपनद्यांच्या खोऱ्यातील सुपीक प्रदेशातील अनुकूल घटल्यामुळे शेती व निगडीत व्यवसायात गुंतलेली सर्वाधिक ग्रामीण लोकसंख्या आढळते.

अहमदनगर जिल्ह्यात नाशिक विभागाच्या एकूण लोकसंख्येपैकी २००१ व २०११ नुसार अनुक्रमे २५.६८ टक्के व २४.४५ टक्के लोकसंख्या आढळते. तसेच सर्वाधिक लोकसंख्या गोदावरी व प्रवरा आणि उपनद्यांच्या सुपीक क्षेत्रातील शेती व पूरक व्यवसायात गुंतलेले असल्याने जिल्ह्यातील ८०.११ टक्के (२००१ नुसार) लोकसंख्या ग्रामीण भागात आढळते. पुढील दहा वर्षांत ही ग्रामीण लोकसंख्या ०.२ टक्के घटलेली आढळते. तर नागरी लोकसंख्येत ०.१९ टक्क्यांनी वाढ झाली. अहमदनगरमध्ये नाशिकनंतर सर्वाधिक पुरुष व स्त्रियांचे प्रमाण आढळते.

नाशिक व अहमदनगर नंतर जळगावमध्ये सर्वाधिक लोकसंख्या आढळते. २००१ ते २०११ नुसार २३.४० टक्के लोकसंख्या पुढील दहा वर्षांत ५.७८ लाखाने वाढून २२.७७ टक्के इतकी झाली. जळगावमध्ये नाशिकनंतर सर्वाधिक लोकसंख्येची घनता व नागरी लोकसंख्या आढळते. या नागरी लोकसंख्येत वाढत्या औद्योगिकीकरण, नागरीकरण व सोयीसुविधांमुळे ३.१४ टक्केने वाढ झालेली आढळते.

धुळे जिल्ह्यात विभागातील २००१ व २०११ नुसार अनुक्रमे १०.८५ टक्के व ११.०४ टक्के लोकसंक्या आढळते. तर जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येत २.१७ लाख व नागरी लोकसंख्येत १.२५ लाखाने वाढ झालेली आहे. धुळे जिल्हा दुष्काळी व औद्योगिकदृष्ट्या मागासलेला, सुविधांचा अभाव असल्याने येथे केवळ १.७४ टक्के नागरी लोकसंख्यावाढ असून ग्रामीण लोकसंख्या व लिंगगुणोत्तराचे प्रमाण (९४६) जास्त आढळते.

नाशिक विभागातील नंदूरबार हा बराचसा डोंगराळ, आदिवासी व औद्योगिकदृष्ट्या मागासलेला असल्याने येथे २००१ व २०११ नुसार अनुक्रमे ८.३४ टक्के व ८.८७ टक्के ही विभागातील सर्वात कमी लोकसंख्या आढळते. नंदूरबार  विभागात सर्वात कमी ग्रामीण व नागरी, स्त्री–पुरुष प्रमाण आढळते. जिल्ह्यातील नर्मदा व तापी खोऱ्यातील प्रदेशात शेती केली जाते तर बराचसा भूभाग हा प्रतिकूल, सुविधांचा अभाव असणाऱ्या प्रदेशात ग्रामीण लोकसंख्या जास्त आहे. परंतु वाढत्या शेतीआधारित उद्योग व कुटिरोद्योगांमुळे ग्रामीण लोकसंख्या २.२६ टक्क्यांनी घट होऊन नागरी लोकसंख्या १.२६ टक्क्यांनी वाढलेली आढळते. नंदुरबारमध्ये विभागातील सर्वाधिक लोकसंख्या वृद्धीदर आढळतो.

नाशिक विभागात महाराष्ट्र राज्याच्या १६.५३ टक्के लोकसंख्या आढळते. विभागातील लोकसंख्या २००१ ते २०११ या काळात २८.४२ लाकाने वाढलेली आढळते. नाशिक विभागातील सर्वाधिक लोकसंख्या नाशिक जिल्ह्यात आहे. कारण गोदावरी व गिरणा नद्यांच्या सुपीक प्रदेशातील शेती तसेच वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण, वाहतूक व सोयीसुविधांची उपलब्धता होय. नंदूरबार जिल्ह्यातील प्रतिकूल परिस्थितीमुळे विभागातील सर्वात कमी लोकसंख्या आढळते. नाशिक विभागातील एकूण नागरी लोकसंख्यावाढ २७.७८ टक्के असून त्यापैकी

**सर्वाधिक नाशिक जिल्ह्यात आढळते. नाशिक विभागात ग्रामीण लोकसंख्या जास्त असली तरी त्यात २००१ ते २०११ या काळात २.४५ टक्क्यांनी घट झालेली असून, रोजगारसंधी व औद्योगिकीकरण, नागरीकरण, लोकांचे आगमन, सोयीसुविधांमुळे नागरी लोकसंख्येत २.३७ टक्क्यांनी वाढ झालेली आढळते. नाशिक विभागात पुरुषांची संख्या ५१.५९ टक्के तर स्त्रियांची संख्या ४८.४१ टक्के असून १८.०६ टक्के इतका वृद्धीदर आढळतो.**

## संदर्भसूची


1) Bhawsar, S.S. and Nile, U.V. (2013). 'Changing Tribal Population Growth in Dhule District,' Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika,33(2), 30-36.
2) Husain, M. (1999). 'Human Geography', Jaipur: Rawat Publications.
3) Kartik, D.B. (2015). 'Spatio Temporal Changes of Population of Sangli District', Ph.D. Thesis, Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune. Unpublished.
4) Patil, A.B. (2010). 'Regional Pattern of Growth and Structure of Population in Maharashtra (1961-2001)',Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur, Unpublished.
5) Patil, V.S. (2014). 'Geographical Study of Population Characteristics in Dhule District(M.S.),'Ph.D. Thesis, Shri Jagdishprasad Jhabarmal Tibrewala University, Rajasthan, Unpublished.
6) Waykar, D. and Nagarale V. (2015). 'A Geographical Analysis of Population Growth and Characteristics in Pune Municipal Corporation (2001-2011),' Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika, 32, (1), 57-65.
7) Census of India (2011) Wikipedia
8) Census of India: District Census Handbook (Nashik District) 2001-2011.
9) Census of India: District Census Handbook (Ahmednagar District) 2001-2011.
10) Census of India: District Census Handbook (Jalgaon District) 2001-2011.
11) Census of India: District Census Handbook (Dhule District) 2001-2011.
12) Census of India: District Census Handbook (Nandurbar District) 2001-2011.
**१३) भैसे, संजय आणि मस्की, देवेंद्र (२०१४)मलोकसंख्या भूगोलम, अथर्व पब्लिकेशन, धुळे.**
**१४) कार्लेकर, श्रीकांत आणि सांगळे, शैलजा (२०१०)'महाराष्ट्राचा भूगोल', डायमंडपब्लिकेशन, पुणे.**
**१५) खरात, ओम आणि पवार, मनोहर(२०१८)'महाराष्ट्रातील जिल्हे', युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन, पुणे.**
**१६) जोशी, अनुजा (२०१०)'महाराष्ट्रातील नद्या', डायमंड पब्लिकेशन, पुणे.**
**१७) सावंत, प्रकाश (२००७)'भूगोल', फडके प्रकाशन, कोल्हापूर.**



*** Manisha Muthal**
Research Student
Department of Geography,
SNDT Women's University
Karve Road PUNE - 411038

***Dr. Virendra Nagarale**
Professor and Head
Department of Geography,
SNDT, Women's University
Karve Road PUNE - 411038